दिनांक ०१.०७.२०२५ रोजी विभागीय आयुक्त कार्यालय, अमरावती येथे कै.वसंतराव नाईक यांचे जयंती कार्यक्रमास उपस्थित






दिनांक ०१.०७.२०२५ रोजी मौजे कलगांव, ता.जि. हिंगोली येथे कुरण लागवड कार्यक्रमास उपस्थित


महात्मागांधीराष्ट्रीयग्रामीणरोजगारहमीकायदा २००५
हिंगोली


महात्मागांधीराष्ट्रीयग्रामीणरोजगारहमीकायदा २००५

देशोन्नती

# चारा लागवडीच्या उपक्रमाचे अ‍ॅड. निलेश हेलोंडे पाटील यांच्या हस्ते कलगाव येथे उद्‌घाटन

देशोन्नती वृत्तसंकलन



**हिंगोली** : कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्षअ‍ॅड. निलेशहेलोंडे पाटील यांच्या हस्ते १ जून रोजी हिंगोली जिल्ह्यातील कलगाव येथील शासकीयगायरानजमिनीवरएक हेक्टर क्षेत्रावर चारा लागवडीच्या उपक्रमाचे उद्‌घाटन करण्यात आले.

या कार्यक्रमास उपजिल्हाधिकारी (रोहयो) अनिल माचेवाड, विभागीय वन अधिकारी (प्रादेशिक) राजेंद्र नाळे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) केशव गड्डापोड, तहसीलदार श्रीकांत भुजबळ, उपविभागीय कृषी अधिकारी प्रदीप कच्छवे, विभागीय वन अधिकारी (सामाजिक वनीकरण), सहाय्यक वनसंरक्षक (प्रादेशिक), तालुका कृषी अधिकारी, वनपरिक्षेत्र अधिकारी, महसूल मंडळ अधिकारी, ग्रामविकास अधिकारी, ग्रामरोजगार सेवक तसेच कलगाव ग्रामपंचायतीचे सरपंच आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. या प्रसंगी अध्यक्षअ‍ॅड. निलेश हेलोंडे पाटील यांनी सांगितले की, आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना शाश्वत उत्पन्नासाठी दुग्ध व्यवसायासाठी प्रोत्साहन देण्यातयेतआहे. अशाकुटुंबांकडे चारा लागवडीसाठी स्वतःची जमीन नसल्यामुळे शासनामार्फत गायरान जमिनीवर चारा लागवड करून त्यांना मदत करण्यात येत आहे. त्यामुळे रोजगार निर्मिती, कार्बन क्रेडिट निर्माण, जमिनीची सुपीकता वाढविणे यासारखे अनेक फायदे होणार आहेत. यावेळी कृषी विभागास चारा लागवड क्षेत्रास तार कुंपण करण्याच्या व वन विभाग प्रादेशिक हिंगोली यांना लागवडीच्या बाजूने सलग समतल चर करण्याच्या सूचना देण्यात आल्या. (प्रतिनिधी)

लोकमत

# आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांसाठी 'मनरेगा'तून चारा उत्पादन

लोकमत न्यूज नेटवर्क

**हिंगोली :** आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना आर्थिक स्थैर्य मिळवून देण्यासाठी सार्वजनिक गायरान जमिनीवर सार्वजनिक कुरण लागवड केली जात आहे. यातून निघणारा चारा आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबीयांना मोफत उपलब्ध करून दिला जाणार आहे. तालुक्यातील कलगाव येथे १ जुलै रोजी या उपक्रमाचे उद्घाटन कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष ॲड. नीलेश हेलोंडे पाटील यांच्या हस्ते झाले.

आत्महत्याग्रस्त कुटुंबांना केवळ शेतीवर अवलंबून न राहता त्यांना शाश्वत उत्पन्नाचा स्रोत उपलब्ध करून देणे. यासाठी, मनरेगामार्फत गायरान जमिनीवर सार्वजनिक कुरण लागवड केली जाणार आहे. या कुटुंबांना दुग्ध व्यवसायासाठी मोफत चारा उपलब्ध होईल. मोफत चारा मिळाल्याने दुग्ध व्यवसायाचा खर्च कमी होईल आणि अधिक आर्थिक स्थैर्य मिळेल. शासकीय पडीक जमिनीचा सुयोग्य वापर होऊन गावातील लोकांना रोजगार मिळेल, ज्यामुळे स्थानिक पातळीवर विकासाला गती मिळेल.

दरम्यान, ॲड. नीलेश हेलोंडे पाटील यांनी आत्महत्याग्रस्त कुटुंबांच्या आर्थिक आणि सामाजिक स्थितीची पाहणी करण्यासाठी मनरेगामार्फत सर्वेक्षण करून त्यांना वैयक्तिक लाभ देण्याचे निर्देश दिले.

## कलगाव येथे उपक्रमाचे उद्घाटन

हिंगोली तालुक्यातील कलगाव येथे सार्वजनिक गायरान जमिनीवर सार्वजनिक कुरण लागवडीचे उद्घाटन कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे ॲड. नीलेश हेलोंडे पाटील (राज्यमंत्री दर्जा) यांच्या हस्ते १ जुलै रोजी झाले. यावेळी उपजिल्हाधिकारी अनिल माचेवाड, उपमुख्य कार्यकारी अधिकारी केशव गड्डापोड, विभागीय वन अधिकारी नाळे, विभागीय वन अधिकारी (सामाजिक वनीकरण) पुष्पा पवार, उपविभागीय कृषी अधिकारी प्रदीप कच्छवे, तहसीलदार श्रीकांत भुजबळ, अशोक वडवळे, अखिलेश कुरील, ग्रामसेविका बोरकर, नीलेश राठौर, नंदकिशोर सावरगावे, नामदेव घ्यार, श्रीरंग घमारे, राधिका घुमणर, घुगे आदींची उपस्थिती होती.

Hello Hingoli
Page No. 1 Jul 03, 2025
Powered by: erelego.com

नवराष्ट्र
www.navarashtra.com

# चारा लागवड उपक्रमाचे कलगाव येथे हेलोंडे यांच्या हस्ते उद्घाटन

**हिंगोली,** (वा.) वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष ॲड. निलेश हेलोंडे पाटील यांच्या हस्ते आज हिंगोली जिल्ह्यातील कलगाव येथील शासकीय गायरान जमिनीवर एक हेक्टर क्षेत्रावर चारा लागवडीच्या उपक्रमाचे उद्घाटन करण्यात आले.

या कार्यक्रमास उपजिल्हाधिकारी (रोहयो) अनिल माचेवाड, विभागीय वन अधिकारी (प्रादेशिक) राजेंद्र नाळे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) केशव गड्डापोड, तहसीलदार श्रीकांत भुजबळ, उपविभागीय कृषी अधिकारी प्रदीप कच्छवे, विभागीय वन अधिकारी (सामाजिक वनीकरण), सहाय्यक वनसंरक्षक (प्रादेशिक), तालुका कृषी अधिकारी, वनपरिक्षेत्र अधिकारी, महसूल मंडळ अधिकारी, ग्रामविकास अधिकारी, ग्रामरोजगार सेवक तसेच कलगाव ग्रामपंचायतीचे सरपंच आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते



## दुग्धव्यवसायासाठी प्रोत्साहन

या प्रसंगी अध्यक्ष ॲड. निलेश हेलोंडे पाटील यांनी सांगितले की, आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना शाश्वत उत्पन्नासाठी दुग्ध व्यवसायासाठी प्रोत्साहन देण्यात येत आहे. अशा कुटुंबांकडे चारा लागवडीसाठी स्वतःची जमीन नसल्यामुळे शासनामार्फत गायरान जमिनीवर चारा लागवड करून त्यांना मदत करण्यात येत आहे. त्यामुळे रोजगार निर्मिती, कार्बन क्रेडिट निर्माण, जमिनीची सुपीकता वाढविणे यासारखे अनेक फायदे होणार आहेत.

यावेळी कृषी विभागास चारा लागवड क्षेत्रास तार कुंपण करण्याच्या व वन विभाग प्रादेशिक हिंगोली यांना लागवडीच्या बाजूने सलग समतल चर करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

Nanded Plus Edition
Jul 03, 2025 Page No. 2
Powered by: Navarashtra.com

दिनांक ०२.०७.२०२५ रोजी आत्महत्याग्रस्त शेतक-याचे कुटूंबातील पात्र व्यक्तींकरीता रोजगार मेळावा तसेच प्रशिक्षण कार्यक्रम आयोजीत करण्याबाबत उपसंचालक, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभाग व संचालक आरसेटी यांचे समवेत चर्चा





दिनांक ०४.०७.२०२५ रोजी जिरोना, ता. उमरी, जि. नांदेड येथे सामाजिक वनीकरण विभागाचे वृक्षरोपण कार्यक्रमास उपस्थित




दिनांक ०४.०७.२०२५ रोजी जिरोना, ता. उमरी, जि. नांदेड येथे प्रस्तावित चारा लागवडीचे ठिकाणास भेट व पाहणी



ॲग्रोवन

# गायरान जमिनीवर चारा लागवड प्रकल्पाला सुरुवात

## ॲड. नीलेश हेलोंडे पाटील : रोहयोतून होणार चारा लागवड

**ॲग्रोवन वृत्तसेवा**

नांदेड : उमरी तालुक्यातील जिरोना येथे गायरान जमिनीवर महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत चारा लागवड प्रकल्पाची सुरुवात कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष ॲड. नीलेश हेलोंडे पाटील यांच्या करण्यात आली. जिल्ह्यात रोहयोअंतर्गत शंभर एकरांवर चारा पिकाची लागवड होणार आहे.

दुष्काळ व चारा टंचाईमुळे विदर्भ व मराठवाड्यामध्ये दूध व्यवसायाला मोठी अडचण निर्माण होत आहे. शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी दूध व्यवसाय हा महत्त्वाचा असल्याचे अनेक अभ्यासामध्ये दिसून आलेले आहे. मराठवाड्यात नांदेड जिल्ह्यामध्ये दुग्ध व्यवसायाला मोठा वाव आहे. परंतु चाऱ्याच्या अडचणी असल्यामुळे शेतकरी जोड व्यवसाय करु शकत नाहीत. परिणामी या जिल्ह्यात शेतकरी आत्महत्या दिसून येत आहेत. यावर मात करण्यासाठी कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशन राज्यात काम करीत आहे. यासाठी प्रत्येक गावात उपलब्ध असलेल्या गायरान जमिनीमध्ये सुपर नेपियर सारखा चारा लावून तो गावातील पशुधनास मोफत मिळाला तर अल्पभूधारक शेतकऱ्यांचा तसेच भूमिहीन मजूरही मोठ्या प्रमाणात दुध व्यवसाय करू शकतील. शेतकऱ्यांना पिकाचा पैसा हातात येण्यासाठी किमान १२० दिवस लागतात तर दुधाचा पैसा दर दहा दिवसाला खात्यामध्ये येऊ शकतो. त्यामुळे शेतकऱ्यांनी हा प्रकल्प आपला स्वतःचा समजून या प्रकल्पात योगदान द्यावे व आपल्या पशुधनासाठीचा आवश्यक चारा आपल्या गावातील गायरानातच उगवावा व दुध व्यवसायातून आर्थिक दृष्ट्या समृद्ध व्हावे असे प्रतिपादन ॲड. निलेश हेलोंडे पाटील यांनी केले. नांदेड जिल्ह्यामध्ये गायरान जमिनीमध्ये चारा लागवड करण्यासाठी १०० एकरचे उद्दिष्ट ठेवल्याचे संजीव मोरे यांनी सांगितले. यावेळी वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे के. डी. देठे, उपजिल्हाधिकारी (रोहयो) संजीव मोरे, जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. राजकुमार पडिले, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. प्रवीणकुमार घुले, डॉ. रोहित धुमाळ, प्रशांत थोरात, उमरी तहसीलदार डॉ. श्रीनिवास जिंकलोड, पशुधन विकास अधिकारी, वनविभागाचे दिनकर पाटील उपस्थित होते.

Nanded, Main
11/07/2025 Page No. 5

देशोन्नती

# शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी दूध व्यवसाय महत्त्वाचा - ॲड. निलेश हेलोंडे

देशोन्नती वृत्तसंकलन

### उमरी तालुक्यात जिरोना येथे गायरान जमिनीत चारा लागवड प्रकल्पाचे उद्घाटन

**नांदेड** : शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी दूध व्यवसाय हा महत्त्वाचा असून यासाठी कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशन महाराष्ट्र राज्य ही संस्था कार्यरत आहे. प्रत्येक गावात उपलब्ध असलेल्या गायरान जमिनीत सुपर नेपियरसारखा चारा उगवून तो गावातील पशुधनास मोफत मिळाला तर अल्पभूधारक शेतकऱ्यांसह भूमिहीन मजूर सुद्धा मोठ्या प्रमाणात दूध व्यवसाय करू शकतील, असे प्रतिपादन कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष (राज्यमंत्री दर्जा) ॲड. निलेश हेलोंडे पाटील यांनी केले.



महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत उमरी तालुक्यातील जिरोना येथे असणाऱ्या गायरान जमिनीत चारा लागवड प्रकल्पाचे उद्घाटन त्यांच्या हस्ते नुकतेच करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते.

सततचा येणारा दुष्काळ व चाराटंचाईमुळे विदर्भ, मराठवाड्यात दूध व्यवसाय मोठ्या प्रमाणावर होत नाही. शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी दूध व्यवसाय हा महत्त्वाचा असल्याचे अनेक अभ्यासात दिसून आले आहे. शेतकऱ्यांना पिकाचा पैसा हातात येण्यासाठी किमान १२० दिवस लागतात तर दुधाचा पैसा दर दहा दिवसाला आपल्या खात्यामध्ये येऊ शकतो. त्यामुळे शेतकऱ्यांनी हा प्रकल्प आपला स्वतःचा समजून या प्रकल्पात योगदान द्यावे व आपल्या पशुधनासाठीचा आवश्यक चारा आपल्या गावातील गायरानातच उगवावा व दूध व्यवसायातून आर्थिक दृष्ट्या समृद्ध व्हावे, असे आवाहन ॲड. निलेश हेलोंडे पाटील यांनी केले.

याच पद्धतीने गायरान जमिनीमध्ये चारा लागवड करण्यासाठी नांदेड जिल्ह्यामध्ये १०० एकरचे उद्दिष्ट ठेवल्याचे मनरेगाचे उपजिल्हाधिकारी संजीव मोरे यांनी सांगितले.

यावेळी वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे के. डी. देठे, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेचे उपजिल्हाधिकारी संजीव मोरे, जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. राजकुमार पडिले, सहाय्यक आयुक्त डॉ. प्रवीण कुमार घुले, डॉ. रोहित धुमाळ, प्रशांत थोरात, तहसीलदार उमरी, डॉ. श्रीनिवास जिंकलोड पशुधन विकास अधिकारी विस्तार पंचायत समिती उमरी, वनविभागाचे दिनकर पाटील तसेच कृषी विभागाचे अधिकारी, जिरोना ग्रामपंचायतीचे सरपंच, उपसरपंच, ग्रामसेवक व नागरिक उपस्थित होते.

Nanded Edition
Jul 11, 2025 Page No. 8
Powered by: erelego.com

दिनांक ०८.०७.२०२५ रोजी मौजे पाथरड गोळे, ता. नेर, जि. यवतमाळ येथे प्रस्तावित चारा लागवडीचे ठिकाणास भेट व पाहणी





दिनांक ०८.०७.२०२५ रोजीमौजे पाथरड गोळे, ता. नेर, जि. यवतमाळ येथे आर्युवेदीक दवाखान्यास भेट व पाहणी





दिनांक ०८.०७.२०२५ रोजीनबाबपूर, ता. नेर, जि. यवतमाळ येथे मृतक प्रमोद गिरी शेतकरी आत्महत्या प्रकरणात कुटूंबियास भेट





दिनांक ०८.०७.२०२५ रोजीमंगरुळ, ता. नेर, जि. यवतमाळ येथे मृतक गौतम मेश्राम शेतकरी आत्महत्या प्रकरणात कुटूंबियास भेट




VIP

पुण्य नगरी

# शेतकरी मिशनच्या अध्यक्षांकडून चारा योजनेचा आढावा

## आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबाला दिली भेट



**पुण्य नगरी** / शहर प्रतिनिधी

**नेर** : कै. वसंतराव नाईक शेतकरी स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष डॉ. नितेश हेलोंडे पाटील यांनी नुकताच नेर तालुक्याला भेट दिली. त्यांनी तालुक्यातील पाथ्रड गोळे येथील नियोजित चारा लागवड ठिकाणाची पाहणी केली.

शेतकरी स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष डॉ. नितेश हेलोंडे पाटील यांनी नेर तालुक्यात ७ जुलै रोजी पाहणीदरम्यान शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे वाढते प्रमाण लक्षात घेता चारा उत्पादन कसे उपयोगी पडू शकते, याविषयी सविस्तर चर्चा केली. त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना, गावातील सर्व शेतकऱ्यांना मोफत चारा पुरवण्यात यावा, यासाठी सूचना त्यांनी दिल्या. या भेटीत चारा उत्पादनाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना आधार देण्याच्या उद्देशाने 'शेतकरी आत्महत्या प्रतिबंध चारा लागवड योजना' राबविण्याचे नियोजन करण्यात आले आहे. यावेळी तहसीलदार पुरुषोत्तम भुसारी, गटविकास अधिकारी, तालुका कृषी अधिकारी, पशुधन विकास अधिकारी काळे, नायब तहसीलदार गोंडे, मंडळ अधिकारी सरपंच नीलिमा रोशन चोपडे, पोलीस पाटील महसूल विभागातील अधिकारी भरत पिसे आदींची उपस्थिती होती. यानंतर डॉ. हेलोंडे पाटील यांनी आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांची भेट घेत त्यांच्याशी संवाद साधला. संबंधित कुटुंबांना शासकीय योजनांचा लाभ मिळतो आहे का याची तपासणी केली. लाभ न मिळाल्यास तत्काळ सुविधा मिळाव्यात यासाठी अधिकाऱ्यांना सूचना केल्या. 'पाल्यांसाठी जीवनदायिनी' योजनेंतर्गत आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या पाल्यांना शैक्षणिक मदत व उपजीविकेसाठी आवश्यक ते मार्गदर्शन देण्यात यावे, अशा सूचना त्यांनी केल्या. त्यांनी नेर येथील दिवंगत शेतकरी विनोद मिरी यांच्या कुटुंबीयांची भेट घेत समस्या जाणून घेतल्या. तसेच, मंगरूळ येथील दिवंगत शेतकरी गौतम शंकरराव मेश्राम कुटुंबाला त्यांनी भेटून त्यांच्या उपजीविकेच्या दृष्टीने उपाययोजना सुचविल्या.

Yavatmal Edition
Jul 10, 2025 Page No. 04
Powered by: erelego.com

दिनांक ०८.०७.२०२५ रोजीआलेगांव, ता. बाभुळगांव, जि. यवतमाळ येथे मृतक अंकुश आडे शेतकरी आत्महत्या प्रकरणात कुटूंबियास भेट





दिनांक ०८.०७.२०२५ रोजीगळव्हा, ता. बाभुळगांव, जि. यवतमाळ येथे मृतक संदिप बोबडे शेतकरी आत्महत्या प्रकरणात कुटूंबियास भेट






दिनांक ०८.०७.२०२५ रोजीगळव्हा, ता. बाभुळगांव, जि. यवतमाळ येथे मृतक विजय मोडक शेतकरी आत्महत्या प्रकरणात कुटूंबियास भेट





लोकमत



# आत्महत्याग्रस्त कुटुंबाची हेलोंडे यांनी घेतली भेट

बाभूळगाव : वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे राज्याध्यक्ष ॲड. नीलेश हेलोंडे-पाटील यांनी बाभूळगाव तालुक्यातील शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबीयांची भेट घेतली. या भेटीदरम्यान त्यांनी आत्महत्याग्रस्त कुटुंबांना विविध शासकीय योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन केले. यावेळी तहसीलदार मीरा किशोर पागोरे, तालुका कृषी अधिकारी, गटविकास अधिकारी, महिला बालविकास अधिकारी तसेच विभागाचे अधिकारी, कर्मचारी हजर होते.

Hello Yavatmal
Page No. 3 Jul 09, 2025
Powered by: erelego.com

दिनांक १०.०७.२०२५ रोजी कृषी उत्पन्न बाजार समिती, कळमना बाजार येथे कोल्ड स्टोअरेजला भेट व पाहणी





दिनांक ११.०७.२०२५ रोजी मौजे जामवाडी ता. जि. जालनायेथे शासकीय गायरान जमिनीवर चारा लागवडीचे कार्यक्रमास उपस्थित





लोकमत



जामवाडी शिवारातील शेतकऱ्यांशी संवाद साधताना नीलेश हलोंडे.

# जामवाडी शिवारातील दोन एकरात चारा लागवड प्रकल्प

## नीलेश हेलोंडे यांच्या हस्ते उपक्रमाचे उद्घाटन

लोकमत न्यूज नेटवर्क

**जालना :** कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष ॲड. नीलेश हेलोंडे पाटील यांच्या हस्ते शुक्रवारी जामवाडी (ता. जालना) येथील शासकीय गायरान जमीन असलेल्या दोन एकर क्षेत्रावर चारा लागवडीच्या उपक्रमाचे उद्घाटन करण्यात आले.

यावेळी या कार्यक्रमास उपजिल्हाधिकारी (रोहयो) मनीषा दांडगे, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी प्रशांत चौधरी, जिपच्या जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. सुरेखा माने, तहसीलदार छाया पवार, विभागीय वन अधिकारी (सामाजिक वनीकरण) सुरेश वडोदे, गट विकास अधिकारी संदीप पवार, तालुका कृषी अधिकारी विष्णू राठोड, वनपरिक्षेत्र अधिकारी एस. के. भिसे, जामवाडी ग्रामपंचायतीचे सरपंच सुधाकर वाडेकर उपस्थित होते.

गायरान जमिनीवर चारा लागवड करून, शेतकरी कुटुंबांना दुग्ध व्यवसायाच्या माध्यमातून शाश्वत अर्थिक उत्पन्नासाठी प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. अनेक कुटुंबांकडे चारा लागवडीसाठी स्वत:ची जमीन नसल्यामुळे शासनामार्फत गायरान जमिनीवर चारा लागवड करून त्यांना मदत करण्यात येत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचा चाऱ्यासाठी होणाऱ्या खर्चाची बचत होणार आहे. तसेच रोजगार निर्मिती, कार्बन क्रेडिट निर्माण, जमिनीची सुपीकता वाढविणे यासारखे अनेक फायदे होणार आहेत. चारा लागवड क्षेत्रास तार कुंपण करण्याच्या सूचनाही ॲड. हेलोंडे यांनी दिल्या.

पार्श्वभूमी
14JUL2025



# चारा लागवड उपक्रमाचे जामवाडी येथे उद्घाटन

जालना/प्रतिनिधी - कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष ॲड. निलेश हेलोंडे यांच्या हस्ते आज शुक्रवारी जालना तालूक्यातील जामवाडी येथील शासकीय गायरान जमिन असलेल्या २ एकर क्षेत्रावर चारा लागवडीच्या उपक्रमाचे उद्घाटन करण्यात आले.



यावेळी उपजिल्हाधिकारी (रोहयो) मनिषा दांडगे, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी प्रशांत चौधरी, जिपच्या जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. सुरेखा माने, तहसिलदार छाया पवार, विभागीय वन अधिकारी (सामाजिक वनीकरण) सुरेश वडोदे, गट विकास अधिकारी संदीप पवार, तालुका कृषी अधिकारी विष्णु राठोड, वनपरिक्षेत्र अधिकारी एस. के. भिसे, जामवाडी ग्रामपंचायतीचे सरपंच सुधाकर वाडेकर यांच्यासह महसूल मंडळ अधिकारी, ग्रामविकास अधिकारी तसेच आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी अध्यक्ष ॲड. निलेश हेलोंडे म्हणाले की, गायरान जमिनीवर चारा लागवड करुन, शेतकरी कुटूंबांना दुग्ध व्यवसायाच्या माध्यमातून शाश्वत अर्थिक उत्पन्नासाठी प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. अनेक कुटूंबाकडे चारा लागवडीसाठी स्वत:ची जमीन नसल्यामुळे शासनामार्फत गायरान जमिनीवर चारा लागवड करुन त्यांना मदत करण्यात येत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचा चाऱ्यासाठी होणाऱ्या खर्चाची बचत होणार आहे. तसेच रोजगार निर्मिती, कार्बन क्रेडिट निर्माण, जमिनीची सुपीकता वाढविणे यासारखे अनेक फायदे होणार आहेत.

यावेळी कृषी विभागास चारा लागवड क्षेत्रास तार कुंपण करण्याच्या व वन विभाग प्रादेशिक जालना यांना लागवडीच्या बाजूने सलग समतल चर करण्यात यावी. तसेच पाऊस कमी पडल्यास या क्षेत्रास पाण्याची व्यवस्था करण्यात यावी, अशा सूचना त्यांनी यावेळी दिल्या.

यावेळी ॲड. हेलोंडे यांनी ग्रामस्थांशी संवाद साधुन त्यांच्या समस्या जाणुन घेत. चारा लागावडीकरीता त्यांना प्रोत्साहित केले.

दिनांक १६.०७.२०२५ रोजी धानोरा देवगांव, ता. जिंतूर, जि. परभणी येथेमृतकबाळू श्रीरंग घोरपडे शेतकरी आत्महत्या प्रकरणात कुटूंबियांची भेट





देशोन्नती

# आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटूंबाचे सांत्वन

## जमिनीच्या पाहणीसह उपाययोजनांवर भर



देशोन्नती वृत्तसंकलन

जिंतूर : कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशन, महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष व राज्यमंत्री दर्जा प्राप्त निलेश हेलांडे यांनी रविवार २० जुलै रोजी जिंतूर तालुक्यातील थानोरा, देवगाव येथे आत्महत्या केलेल्या शेतकरी कै. बाळू श्रीरंग घोरपडे यांच्या कुटुंबाला भेट देऊन त्यांचे सांत्वन केले. त्यांच्या समवेत कृषी क्षेत्रातील अभ्यासक आणि सामाजिक कार्यकर्ते श्री. कृष्णकुमार जेठे देखील उपस्थित होते.

या भेटीदरम्यान कै. बाळू घोरपडे यांची पत्नी संगीता, मुलगा आणि मुलीची भेट घेऊन त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. कुटुंबाला शासकीय योजनांचा लाभ कसा मिळवून देता येईल, याबाबत उपस्थित अधिकाऱ्यांशी चर्चा करत आवश्यक त्या सूचना दिल्या. या वेळी तहसीलदार राजेश सरोदे, नायब तहसीलदार राखे, महसूल मंडळ अधिकारी बडगुजर, पठाण, तलाठी सौ. घाटूळ, महसूल सहायक कपाटे, पंचायत समितीचे बी.डी.ओ. ढोणे, तालुका कृषी अधिकारी घुगे व इतर विभागांचे अधिकारी उपस्थित होते. याच दौऱ्यात मा. हेलांडे यांनी तहसीलदार, कृषी अधिकारी यांच्या समवेत मराठवाड्यातील शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी उपाययोजना काय असाव्यात याचा गंभीरपणे विचार केला. त्यानुसार, तालुक्यातील गायरान जमिनींची पाहणी करून जनावरांसाठी चारा लागवड करण्याचा आराखडा तयार करण्याबाबत निर्देश दिले. शेतकऱ्यांच्या प्रश्नांची दखल घेत शासन सकारात्मक भूमिका बजावत असून आत्महत्या रोखण्यासाठी समन्वयाने काम करण्याचे आवाहन त्यांनी उपस्थित अधिकाऱ्यांना यावेळी केले

दिनांक १६.०७.२०२५ रोजी मौजे हालविरा, ता. जिंतूर, जि. परभणी येथे येथे प्रस्तावित शासकीय गायरान जमिनीवर चारा लागवडीचे ठिकाणास भेट व पाहणी





दिनांक १६.०७.२०२५ रोजीजिंतूर, जि. परभणी येथे शेतकरी आत्महत्या रोखण्याकरीता करावयाच्या उपाययोजनाबाबत तहसिलदार, गटविकास अधिकारी, तालुका कृषी अधिकारी, पशुधन विकास अधिकारी यांचे समवेत बैठक व चर्चा





दिनांक १७.०७.२०२५ रोजी मौजे वाठोडा बु., ता. धामणगांव रेल्वे येथे शासकीय गायरान जमिनीवर चारा लागवडीचे कार्यक्रमास उपस्थित






दिनांक १७.०७.२०२५ रोजी वरुड बगाजी, ता. धामणगांव रेल्वे येथे मृतकनिलेश महादेव पारीसे शेतकरी आत्महत्या प्रकरणात कुटूंबियांची भेट





दिनांक १७.०७.२०२५ रोजीपिंपळखुटा, ता. धामणगांव रेल्वे येथे मृतकप्रमोदगावंडे शेतकरी आत्महत्या प्रकरणात कुटूंबियांची भेट





# आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांची ऐकली कैफियत

## वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे हेलोंडे यांनी घेतली भेट

लोकमत न्यूज नेटवर्क

**धामणगाव रेल्वे (अमरावती) :** नापिकी व कर्जाच्या बोजामुळे दीड वर्षांपूर्वी आत्महत्या केलेल्या दोन शेतकऱ्यांच्या कुटुंबाच्या घरी भेट देऊन कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनच्या अध्यक्ष तथा राज्यमंत्री दर्जा असलेले ॲड. नीलेश हेलोंडे-पाटील यांनी कैफियत ऐकली.

धामणगाव रेल्वे तालुक्यातील वरूड बगाजी येथील नीलेश महादेव पारिसे यांनी २० जुलै २०२४ रोजी, तर पिंपळखुटा येथील प्रमोद रामदास गावंडे या शेतकऱ्याने दीड वर्षापूर्वी नापिकी, कर्ज बोजा अशा विविध कारणांमुळे आत्महत्या केली होती. शासन योजनांचा लाभ कितपत मिळतो, याच्या पडताळणीसाठी नीलेश हेलोंडे-पाटील यांनी शेतकरी कुटुंबांना त्यांच्या घरी भेट दिली. कुटुंबाची आर्थिक स्थिती, मुलांचे शिक्षण, शासनाच्या योजना याविषयी सविस्तर माहिती जाणून घेतली.



व ॲड. हेलोंडे शेतकरी कुटुंबाशी संवाद साधताना.

क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले संगोपन योजनाअंतर्गत दोन्ही कुटुंबांच्या पाल्यांना महिन्याकाठी दोन हजार २५० रुपये मानधन देण्याचे निर्देश ॲड. हेलोंडे यांनी यावेळी जिल्हा बाल संरक्षण अधिकारी यांना दिले. यादरम्यान जनावरांना चारा मिळावा, याकरिता रोहयोअंतर्गत वाठोडा बु. येथील दोन एकर शासकीय जागेवरील कुरण क्षेत्राचे उद्घाटन त्यांनी केले.

यावेळी मुख्यमंत्र्यांचे स्वीय सहायक प्रमोद कापडे, तहसीलदार अभय घोरपडे, गटविकास अधिकारी योगेश वानखडे, एकात्मिक बाल महिला व बालविकास अधिकारी गायत्री चव्हाण यांची उपस्थिती होती. तालुक्यातील आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबीयांना क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले संगोपन योजनेचा लाभ देण्यासाठी नियोजन करण्यात येणार असल्याची माहिती तहसीलदार अभय घोरपडे यांनी दिली.

दिनांक १९.०७.२०२५ रोजी वर्धा जिल्ह्यातील आर्वी तालुक्यामध्ये कमलनयन जमनालाल बजाज फाउंडेशन व महाराष्ट्र शासनाच्या सहकार्याने राबविण्यात येणा-या नदी पुनरुज्जीवन प्रकल्पास भेट व पाहणी





दिनांक १९.०७.२०२५ रोजी वर्धा जिल्हयातील आर्वी तालुक्यामध्ये कमलनयन जमनालाल बजाज फाउंडेशन तर्फे आयोजीत शेतक-यांना मोफत बायोचार वाटप कार्यक्रमास उपस्थित



नवराष्ट्र
www.navarashtra.com

# पीक उत्पन्न वाढीसाठी बायोचारचा वापर करा

## माधव कोटस्थाने; बायोचार बॅग वाटप

**वर्धा,** ब्युरो.पर्यावरणीय बदलाचा, कार्बन उत्सर्जनाचा शेती क्षेत्राला मोठ्या प्रमाणात फटका बसत आहे. अशा परिस्थितीत शाश्वत शेतीकडे शेतकऱ्यांचा कल वाढावा म्हणून संस्था विविध उपक्रम राबवित आहे. कमीत कमी खर्चात पिकांच्या उर्वरित अवशेषापासून मातीचा पोत सुधारून शेतजमिनीतील प्रमाण सुधारण्यासाठी आणि उत्पन्न वाढ होण्यासाठी सेंद्रिय खताबरोबर बायोचारचा वापर उपयुक्त आहे, असे प्रतिपादन पूर्ती सिंचन समृद्धी कल्याणकारी संस्थेचे सचिव माधव कोटस्थाने यांनी केले.

पूर्ती सिंचन समृद्धी कल्याणकारी संस्था व वरदा शेतकरी उत्पादक कंपनी यांच्या संयुक्त विद्यमाने केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या विकसित गाव संकल्पनेला अनुसरून तामसवाडा येथील शेतकरी गटाच्या शेतकऱ्यांना शनिवारी (दि. 19) बायोचर बॅग वाटप करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी स्व. वसंतराव नाईक शेतकरी स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष (राज्यमंत्री दर्जा प्राप्त) ॲड. नीलेश हेलोंडे पाटील, पूर्ती सिंचन समृद्धी कल्याणकारी संस्थेचे सचिव माधव कोटस्थाने, वरदा शेतकरी उत्पादक कंपनीचे कार्यकारी संचालक विनेश काकडे, कमलनयन बजाज फाऊंडेशनचे महेंद्र फाटे आदींची उपस्थिती होती. यानंतर वरदा शेतकरी उत्पादक कंपनीचे वतीने हिंगणघाट तालुक्यातील खानगांव जनकेश्वर येथील शेतात तयार करण्यात आलेले बायोचर खताचे वाटप करण्यात आले. प्रती शेतकऱ्यांना 2 क्विंटल खत (बायोचर)चे वाटप करण्यात आले. संचालन सत्यजित जांभुळकर यांनी केले.



### या शेतकऱ्यांना मिळाला लाभ

तामसवाडा येथील मेघराज चलाख, संदीप अडसुळे, छत्रपती पटील, समीर अडसळ, नितीन हिवसे, सुधाकर न्याहारे, सखू न्याहारे, उत्तम हिवसे, मोहन मोहीजे, हरी चावरे, नाना चावरे, शेखर मेंढेवार, मयुर अडसड, अमित गोमासे, अंकुश देशभ्रतार या शेतकऱ्यांना खत वाटपाचा लाभ देण्यात आला. बांधापर्यंत बायोचार पोहोचविण्याची जबाबदारी उमेश धानफोले यांनी उचललेली होती.

### ड्रोनच्या साहाय्याने फवारणीचे प्रात्यक्षिक

शेतकऱ्यांना खताचे वाटप करण्यात आल्यानंतर वरदा शेतकरी उत्पादक कंपनीच्यावतीने शेतातील पिकांना ड्रोनच्या साहाय्याने फवारणीचे प्रात्यक्षिक ड्रोन पायलट परेश पलकंडवार यांनी दाखविले. गावातील शेतकरी मेघराज चलाख यांच्या शेतात फवारणीदेखील करण्यात आली. यावेळी फवारणीबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

सकाळ

# तामसवाडा येथील शेतकऱ्यांना बायोचार बॅग

## पूर्ती सिंचन समृद्धी कल्याणकारी संस्थेचा लोकोपयोगी उपक्रम

■ सकाळ वृत्तसेवा

वर्धा, ता. २० : पूर्ति सिंचन समृद्धी कल्याणकारी संस्था व वरदा शेतकरी उत्पादक कंपनी यांच्या संयुक्त विद्यमाने केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या विकसित गाव संकल्पनेला अनुसरून तामसवाडा येथील शेतकरी गटाच्या शेतकऱ्यांना बायोचर बॅगचे वितरण करण्यात आले. शनिवार (ता.१९) तामसवाडा येथील शेत परिसरात हा उपक्रम आयोजित करण्यात आला.

कार्यक्रमाला स्व. वसंतराव नाईक शेतकरी स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष ॲड. नीलेश हेलोंडे पाटील, पूर्ती सिंचन समृद्धी कल्याणकारी संस्थेचे सचिव माधव कोटस्थाने, वरदा शेतकरी उत्पादक कंपनीचे कार्यकारी संचालक विनेश काकडे, कमलनयन बजाज फाऊंडेशनचे महेंद्र फाटे प्रामुख्याने उपस्थित होते. मान्यवरांचे पुष्पगुच्छ



देऊन स्वागत करण्यात आले. यानंतर वरदा शेतकरी उत्पादक कंपनीच्या वतीने हिंगणघाट तालुक्यातील खानगाव येथील जनकेश्वर येथील शेतात तयार करण्यात आलेले बायोचर खताचे वाटप करण्यात आले. प्रत्येक शेतकऱ्याला दोन क्विंटल खत (बायोचर) चे वाटप करण्यात आले. पर्यावरणीय बदलाचा, कार्बन उत्सर्जनाचा शेती क्षेत्राला मोठ्या प्रमाणात फटका बसत असत आहे. अशा परिस्थितीत शाश्वत शेतीकडे शेतकऱ्यांचा कल वाढावा म्हणून संस्था विविध उपक्रम राबवत आहे. कमीत कमी खर्चात पिकांच्या उर्वरित अवशेषापासून मातीचा पोत सुधारून शेतजमिनीतील कर्बाचे प्रमाण सुधारण्यासाठी आणि उत्पन्न वाढ होण्यासाठी सेंद्रिय खता बरोबर बायोचारचा वापर कसा उपयुक्त आहे, याची माहिती यावेळी देण्यात आली. संचालन सत्यजीत जांभुळकर यांनी केले. आभार किशोर इंगोले यांनी मानले. यावेळी तामसवाडा गांवातील शेतकरी व नागरिक उपस्थित होते. शेतकऱ्यांना खताचे वाटप करण्यात आल्यानंतर वरदा शेतकरी उत्पादक कंपनीच्यावतीने शेतातील पिकांना ड्रोनच्या सहायाने फवारणीचे प्रात्यक्षिक ड्रोन पायलट परेश पलकंडवार यांनी दाखविले.

### यांना मिळाला लाभ

■ मेघराज चलाख, संदीप अडसूळे, छत्रपति पाटिल समीर अडसळ, नितिन हिवसे, सुधाकर न्याहारे, सखु न्याहारे, उत्तम हिवसे, मोहन मोहिजे, हरी चावरे, नाना चावरे, शेखर मेंढेवार, मयुर अडसड, अमित गोमासे, अंकुश देशभ्रतार या शेतकर्यांना खत वाटपाचा लाभ देण्यात आला. बांधापर्यंत बायोचार पोहचविण्याची जबाबदारी उमेश धानफोले यांनी सांभाळली.

दिनांक २२.०७.२०२५ रोजी मौजे डोंगरगांव, ता. कारंजा लाड, जि. वाशिम येथे प्रस्तावीत शासकीय गायरान जमीनीवर चारा लागवडीचे ठिकाणास भेट व पाहणी





दिनांक २२.०७.२०२५ रोजी खेरडा, ता. कारंजा लाड, जि. वाशिम येथे मृतक अक्षय येवले शेतकरी आत्महत्या प्रकरणात कुटूंबियांची भेट





दिनांक २२.०७.२०२५ त-हाळा, ता. मंगरुळपीर, जि. वाशिम येथे चारा लागवडीकरीता शेतक-यांना थोंबे वाटप कार्यक्रमास उपस्थित





देशोन्नती

# चारा लागवड उपक्रमातून दुग्ध व्यवसायाला चालना

## ॲड. निलेश पाटील हेलोडे यांचे प्रतिपादन

देशोन्नती वृत्तसंकलन

**मगरूळपीर** : शेतीसोबत दुग्ध व्यवसाय करताना चाऱ्याची उपलब्धता अत्यंत महत्त्वाची आहे. वाशिम जिल्ह्यात शासनाने शेतकऱ्यांच्या जनावरसाठी काही शासकीय ईक्लास (गायरान) जमिनीवर चारा लागवड केली त्यामुळे भविष्यात दुग्ध व्यवसायात वाढ होऊ शकते, असे प्रतिपादन कै. वसंतराव नाईक शेतीस्वावलंबन मिशनचे अध्यक्ष (राज्यमंत्री दर्जा) ॲड. निलेश पाटील हेलोडे यांनी केले.

मगरूळपीर तालुक्यातील तर्हाळा ग्रामपंचायतीने २२ जुलै रोजी दोन एकर ईक्लास जमिनीवर चारा लागवड करून या उपक्रमाचा सुरुवात केली. व या अगोदर जी चारा लागवड झाली होती त्याची रोपे व चारा शेतकऱ्यांना निलेश पाटील हेलोडे यांच्या हस्ते या चाऱ्याचे शेतकऱ्यांना मोफत वाटप आले. ॲड. हेलोंडे यांनी या वेळी सांगितले की, 'शासनाच्या माध्यमातून जिल्ह्यात विविध गावांतील शासकीय गायरान पडीत जमिनीवर चारालागवडीचा उपक्रम राबवला जातआहे. शेतकऱ्यांनी याचा लाभ घ्यावा. मोफत बेणे व चारा पुरवठा यामुळे दुधाचे उत्पादन वाढून पशुपालकांचे उत्पन्नही वाढेल. या चारा वाटप कार्यक्रमाला अमरावती येथील कृषी अधीक्षक निलेश ठोबरे, जनसपर्क अधिकारी प्रमोद कापडे,



तहसीलदार शितल बडकर, मानोरा येथील पत्रकार राजू ठाकरे, सागर म्हैसने, गणेश म्हैसने, सरपंच अजय मोहळे, उपसरपंच मोहन गावंडे, ग्रामसेवक पिंपळकर, रोजगार सेवक विलास बाईस्कर, दीपक देशमुख, भिकाजी राऊत, प्रीतम भगत, भीमराव बुरे, मंडळ अधिकारी, तलाठी, ग्रामपंचायत सदस्य व स्थानिक शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेतीला पूरक व्यवसाय म्हणून पशुपालनाकडे वळताना अशा उपक्रमांमुळे चारा उपलब्ध होऊन दुग्ध उत्पादनात वाढ होणार आहे. त्यामुळे ग्रामपंचायतींनी पुढाकार घेऊन अशा प्रकारची चारा लागवड आपल्या गावातही राबवावी, असे आवाहन उपस्थित मान्यवरांनी यावेळी केले. ता.प्र.

Washim Edition
Jul 24, 2025 Page No. 7
Powered by: erelego.com

पुण्य नगरी

# चारा लागवड उपक्रमातून दुग्ध व्यवसायाला चालना

## ॲड. नीलेश हेलोडे यांचे प्रतिपादन

मंगरूळपीर, दि. २४ (प्रतिनिधी)

शेतीसोबत दुग्ध व्यवसाय करताना चाऱ्याची उपलब्धता अत्यंत महत्त्वाची आहे. वाशीम जिल्ह्यात शासनाने शेतकऱ्यांच्या जनावरसाठी काही शासकीय ईक्लास (गायरान) जमिनीवर चारा लागवड केली. त्यामुळे भविष्यात दुग्ध व्यवसायात वाढ होऊ शकते, असे प्रतिपादन कै. वसंतराव नाईक शेतीस्वावलंबन मिशनचे अध्यक्ष (राज्यमंत्री दर्जा) ॲड.निलेश पाटील हेलोडे यांनी केले.



मगरूळपीर तालुक्यातील तऱ्हाळा ग्रामपंचायतीने २२ जुलै रोजी दोन एकर ईक्लास जमिनीवर चारा लागवड करून या उपक्रमाचा सुरुवात केली. व या अगोदर जी चारा लागवड झाली होती. त्याची रोपे व चारा शेतकऱ्यांना निलेश पाटील हेलोडे यांच्याहस्ते या चाऱ्याचे शेतकऱ्यांना मोफत वाटप करण्यात आले. ॲड. हेलोंडे यांनी यावेळी मार्गदर्शनात सांगितले की, शासनाच्या माध्यमातून जिल्ह्यात विविध गावांतील शासकीय गायरान पडीत जमिनीवर चारा लागवडीचा उपक्रम राबवला जात आहे. शेतकऱ्यांनी याचा लाभ घ्यावा. मोफत बेणे व चारा पुरवठा यामुळे दुधाचे उत्पादन वाढून पशुपालकांचे उत्पन्नही वाढेल. या चारा वाटप कार्यक्रमाला अमरावती येथील कृषी अधीक्षक निलेश ठोबरे, जनसंपर्क अधिकारी प्रमोद कापडे, तहसीलदार शितल बंडगर, राजू ठाकरे, सागर म्हैसने, गणेश म्हैसने, सरपंच अजय मोहळे, उपसरपंच मोहन गावंडे, ग्रामसेवक पिंपळकर, रोजगार सेवक विलास बाईस्कर, दीपक देशमुख, भिकाजी राऊत, प्रीतम भगत, भीमराव बुरे, मंडळ अधिकारी, तलाठी, ग्रामपंचायत सदस्य व स्थानिक शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.शेतीला पूरक व्यवसाय म्हणून पशुपालनाकडे वळताना अशा उपक्रमांमुळे चारा उपलब्ध होऊन दुग्ध उत्पादनात वाढ होणार आहे. त्यामुळे ग्रामपंचायतींनी पुढाकार घेऊन अशा प्रकारची चारा लागवड आपल्या गावातही राबवावी, असे आवाहन उपस्थित मान्यवरांनी यावेळी केले.

दिनांक २५.०७.२०२५ रोजी मौजे मंगरूळ,ता. कळंब, जि. धाराशिव येथे मृतक बालाजी बळीराम डुकरे शेतकरी आत्महत्या प्रकरणात कुटुंबियासभेट



दिव्य मराठी **धाराशिव जिल्हा** 26-07-2025

**शेती स्वावलंबन मिशन • आत्महत्याग्रस्त बालाजी डुकरे यांच्या आई-वडिलांनी ॲड. हेलोंडेंसमोर मांडली व्यथा**

# मुलगा गेल्याने आभाळ कोसळलं, लेकरांना आधार द्या

शीतलकुमार घोंगडे | कळंब

'आमचा मुलगाच आमचं जगणं होतं... तो गेला आणि आमचं आभाळच कोसळलं... आता तुम्हीच आमचे मायबाप आहात, आम्हाला व आमच्या लेकराला आधार द्या', ही व्यथा आत्महत्याग्रस्त बालाजी बळीराम डुकरे यांच्या थकलेल्या आई-वडिलांनी ॲड. निलेश हेलोंडे यांच्यासमोर मांडली.

कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष तथा राज्यमंत्री ॲड. निलेश हेलोंडे हे शहरात आले असता त्यांनी तालुक्यातील मंगरूळ येथे डुकरे कुटुंबीयांची भेट घेत त्यांचे सांत्वन केले. आत्महत्याग्रस्त कुटुंबातील वारसांना स्वयंरोजगार प्रशिक्षण, वन्यप्राण्यांमुळे झालेली नुकसान भरपाई, रेशीम लागवड, मनरेगा, दुधाळ जनावरे व शेळी वाटप योजना, भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड, गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान, एकात्मिक फलोत्पादन विकास खरीप कर्ज वाटप आदी योजनांचा आढावा घेतला. ॲड. हेलोंडे म्हणाले की, कृषी विभागाच्या योजना आत्महत्याग्रस्त कुटुंबांपर्यंत प्राधान्याने पोहोचवा. किती आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना याचा फायदा झाला, याचा आढावा घेण्यासाठी कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष ॲड. निलेश हेलोंडे यांनी दौरा केला. यावेळी त्यांनी कळंब तालुक्यातील मंगरूळ येथील आत्महत्याग्रस्त बालाजी बळीराम डुकरे यांच्या कुटुंबीयांना भेट दिली आहे. यावेळी तहसीलदार हेमंत ढोकले, तालुका कृषी अधिकारी भागवत सरडे, कृषी सहायक बालाजी देशमुख, पशुसंवर्धन अधिकारी, पंचायत समिती अधिकारी, सरपंच व इतर पदाधिकारी उपस्थित होते.



शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष ॲड. निलेश हेलोंडे यांनी आत्महत्याग्रस्त डुकरे कुटुंबाची भेट घेतली.

### सरकार आणि मी आपल्या पाठीशी असल्याचे सांगत धीर

कळंब तालुक्यातील मंगरूळ येथील बालाजी बळीराम डुकरे या शेतकऱ्याने गतवर्षी २७ ऑक्टोबर २०२३ रोजी नापिकीने नैराश्यात गळफास घेत आत्महत्या केली होती. राज्यमंत्री ॲड. निलेश हेलोंडे यांनी या कुटुंबाच्या घरी भेट दिली. बळीराम डुकरे यांनी हेलोंडे यांना आमचा मुलगाच गेला, पण आमचं जगणं आता लेकरांसाठी आहे. त्याचं शिक्षण, त्याचं भविष्य तुमच्या आधारावर आहे, अशी व्यथा मांडली. ॲड. हेलोंडे यांनी 'तुम्ही एकटे नाही, मी आहे ना, सरकार आणि मी दोघंही तुमच्या पाठीशी ठामपणे उभे आहोत, असा धीर दिला आहे. मुलांशी संवाद साधत अभ्यासाबद्दल माहिती घेतली. 'तुला काय बनायचे आहे, असे विचारले. मुलाने 'मला इंजिनिअर बनायचे आहे', असे सांगितले. यावेळी राज्यमंत्री ॲड. हेलोंडे यांनी 'आम्ही तुमच्यासोबत आहोत, असे अश्वासन दिले.

### आत्महत्याग्रस्त कुटुंबांना योजनांचा देण्याचे दिले निर्देश

पशुधन योजना देऊन दुधाळ जनावरे किंवा शेळ्या वाटप करा, फळबाग लागवड, मनरेगा, रेशीम उत्पादन, अपघात सुरक्षा योजना, खरीप हंगाम कर्ज, घरकुल अशा विविध योजनांचा लाभ देण्याच्या सुचना ॲड. हेलोंडे यांनी संबधित विभागाच्या अधिकाऱ्यांना दिल्या आहेत.

दिनांक २५.०७.२०२५ रोजीनवजीवन गोशाळा मौजे मंगरूळ पाटी ता. कळंब, जि. धाराशिव येथे नवजीवन गोशाळेसभेट व पाहणी





दिनांक २५.०७.२०२५ रोजी मौजेकनेरी ता. वाशी, जि. धाराशिव येथे मृतकदत्ता माणिक देवकाते शेतकरीआत्महत्या प्रकरणात कुटूंबियास भेट





आधुनिक केसरी
09 Aug 2025
https://www.adhunikkesari.com/epaper/news/71884/6896264c6ee35

# कण्हेरी येथे अँड.निलेश हेलोंडे पाटील यांच्याकडून आत्महत्याग्रस्त कुटुंबाची भेट

आधुनिक केसरी न्यूज



**धाराशिव :** जिल्ह्यात मा. अँड.निलेश हेलोंडे पाटील, अध्यक्ष (राज्यमंत्री दर्जा) कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशन महाराष्ट्र राज्य यांचा जुलै महिन्याच्या अखेरीस धाराशिव जिल्हा दौरा कार्यक्रम झाला असून सदरील दौऱ्या दरम्यान धाराशिव जिल्ह्यातील वाशी तालुक्यातील मौजे कन्हेरी येथील शेतकरी आत्महत्या ग्रस्त शेतकरी कुटुंबाला भेट देण्यात आली. वाशी तालुक्यातील कण्हेरी येथील देवकते कुटुंबातील शेतकरी कै. दत्ता माणिक देवकते यांनी दि_21/01/2023 रोजी आत्महत्या केली होती. त्यावेळी सदरील मयत शेतकरी यांच्या कुटूंबासाठी लाभ देण्याकरिता प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी यांना सादर करण्यात आला असुन त्याअनुषंगाने सदरील शेतकरी आत्महत्या प्रकरणी वारसाना मदत देण्याकरिता पात्र करण्यात आले आहे. त्यानुसार मयत शेतकरी कै.दत्ता देवकते यांच्या कुटुंबांना अनुदान वाटप करण्यात आले होते. इथून पुढेही त्या आत्महत्याग्रस्त कुटुंबातील वारसांना शासनाच्या विविध विभागाच्या योजना बाबत त्या त्या विभागांना त्वरित योजना मार्गी लावन्याच्या सूचना देऊन, त्या देवकते कुटुंबाचे सांत्वन कै.वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशन महाराष्ट्र राज्य अध्यक्ष (राज्यमंत्री दर्जा) माननीय श्री अँड.निलेश हेलोंडे पाटील यांनी केले.

दिनांक २५.०७.२०२५ रोजी कनेरी ता. वाशी, जि. धाराशिवयेथील दवाखान्यास भेट व पाहणी





दिनांक २५.०७.२०२५ रोजी सरमकुंडी फाटा ता. वाशी, जि. धाराशिव येथील खवा युनिटला भेट व पाहणी





दिनांक २५.०७.२०२५ रोजी विश्रामभवन धाराशिव येथे चारा लागवड व आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबांना शासकीय योजनेचा लाभ मिळणे बाबतची आढावा बैठक





दिनांक २५.०७.२०२५ रोजी मौजे पाटोदा ता. जि. धाराशिव येथील गायरान जमिनीवर चारा लागवडीचा शुभारंभ कार्यक्रमास उपस्थित





# वृत्तपत्र कात्रणे

महाराष्ट्र शासन

**माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,**
**जिल्हा माहिती कार्यालय, धाराशिव**

मध्यवर्ती प्रशासकीय इमारत
कक्ष क्र.२८, पहिला मजला,
धाराशिव - ४१३ ५०१.

दूरध्वनी क्र. ०२४७२-२२२७४४ ई-मेल : inf.osd501@gmail.com

वृत्तपत्राचे नाव :- ______ दिनांक :- 29 JUL 2025

31 JUL 2025

## गायरान जमिनीवर चारा लागवडीचा उपक्रम

धाराशिव, ता. ३० : जिल्हाधिकारी कीर्तीकिरण पुजार यांच्या मार्गदर्शनाखाली मनरेगा योजनेतून गायरान जमिनीवर चारा पिकांची लागवड करण्याचा उपक्रम राबविण्यात येत आहे. यासाठी जिल्हास्तरावर तहसीलदार, गटविकास अधिकारी, वनविभाग, सामाजिक वनीकरण व पशुसंवर्धन विभाग यांच्या सहभागाने समिती स्थापन करण्यात आली आहे. या उपक्रमात तालुकानिहाय गायरान जमिनींची माहिती संकलित करून चारा लागवड केली जाणार आहे. त्याअंतर्गत कै. वसंतराव नाईक स्वातंत्र्य मिशनचे अध्यक्ष ॲड. नीलेश हेलोंडे पाटील यांनी धाराशिव तालुक्यातील पाटोदा येथील पशुवैद्यकीय दवाखान्याच्या परिसरातील चारा लागवडीसाठी जागेची पाहणी केली. तसेच नेपियर गवत लागवडीच्या प्रकल्पाचे उद्घाटन केले.

## गायरान जमिनीवर चारा लागवडीचा उपक्रम
## जिल्ह्यात मनरेगाअंतर्गत उपयुक्त पाऊल

धाराशिव दि.२८ जुलै (प्रतिनिधी) जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार यांच्या मार्गदर्शनाखाली मनरेगा योजनेंतर्गत गायरान जमिनीवर चारा पिकांची लागवड करण्याचा उपक्रम राबविण्यात येत आहे. यासाठी जिल्हास्तरावर तहसीलदार, गटविकास अधिकारी, वनविभाग, सामाजिक वनीकरण व पशुसंवर्धन विभाग यांच्या सहभागाने समिती गठीत करण्यात आली आहे.

या उपक्रमात तालुकानिहाय गायरान जमिनीची माहिती संकलित करून चारा लागवड केली जाणार आहे. त्याअंतर्गत २५ जुलै रोजी कै. वसंतराव नाईक स्वातंत्र्य मिशनचे अध्यक्ष (राज्यमंत्री दर्जा) ॲड. नितेश हेलोंडे पाटील यांनी धाराशिव तालुक्यातील पाटोदा गावातील पशुवैद्यकीय दवाखान्याच्या परिसरातील चारा लागवडीसाठी निश्चित जागेची पाहणी करून नेपियर गवत लागवडीच्या प्रक्षेत्राचे उद्घाटन केले.

यावेळी त्यांनी उपस्थित अधिकारी, कर्मचारी आणि पशुपालकांना चारा टंचाईच्या पार्श्वभूमीवर अधिकाधिक चारा उपलब्धतेसाठी मार्गदर्शन केले. आत्महत्या प्रभावित शेतकरी कुटुंबांना व पशुपालकांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळावा यावरही त्यांनी भर दिला.

कार्यक्रमास डॉ.मनोज घाटे (जिल्हा पशुसंवर्धन), तहसीलदार श्रीमती मृणाल जाधव, गटविकास अधिकारी संतोष नलावडे, डॉ.मुकुंद तावरे (सहाय्यक आयुक्त), डॉ. पांडुरंग इंगळे (पशुधन विकास अधिकारी), कृषी अधिकारी, मंडळ अधिकारी श्रीमती एस.पी.कांबळे, ग्राम महसूल अधिकारी श्रीमती मुळेकर, सरपंच श्रीमती सुमन भद्दे आणि उपसरपंच श्रीमती बबीता विनोद केदार उपस्थित होते.

29 JUL 2025

## गायरान जमिनीवर चारा लागवडीचा उपक्रम

धाराशिव दि.२८ : जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार यांच्या मार्गदर्शनाखाली मनरेगा योजनेंतर्गत गायरान जमिनीवर चारा पिकांची लागवड करण्याचा उपक्रम राबविण्यात येत आहे. यासाठी जिल्हास्तरावर तहसीलदार, गटविकास अधिकारी, वनविभाग, सामाजिक वनीकरण व पशुसंवर्धन विभाग यांच्या सहभागाने समिती गठीत करण्यात आली आहे.

या उपक्रमात तालुकानिहाय गायरान जमिनीची माहिती संकलित करून चारा लागवड केली जाणार आहे. त्याअंतर्गत २५ जुलै रोजी कै. वसंतराव नाईक स्वातंत्र्य मिशनचे अध्यक्ष (राज्यमंत्री दर्जा) ॲड. नितेश हेलोंडे पाटील यांनी धाराशिव तालुक्यातील पाटोदा गावातील पशुवैद्यकीय दवाखान्याच्या परिसरातील चारा लागवडीसाठी निश्चित जागेची पाहणी करून नेपियर गवत लागवडीच्या प्रक्षेत्राचे उद्घाटन केले. यावेळी त्यांनी उपस्थित अधिकारी, कर्मचारी आणि पशुपालकांना चारा टंचाईच्या पार्श्वभूमीवर अधिकाधिक चारा उपलब्धतेसाठी मार्गदर्शन केले. आत्महत्या प्रभावित शेतकरी कुटुंबांना व पशुपालकांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळावा यावरही त्यांनी भर दिला. कार्यक्रमास डॉ. मनोज घाटे (जिल्हा पशुसंवर्धन), तहसीलदार श्रीमती मृणाल जाधव, गटविकास अधिकारी संतोष नलावडे, डॉ. मुकुंद तावरे (सहाय्यक आयुक्त), डॉ. पांडुरंग इंगळे (पशुधन विकास अधिकारी), कृषी अधिकारी, मंडळ अधिकारी श्रीमती एस.पी. कांबळे, ग्राम महसूल अधिकारी श्रीमती मुळेकर, सरपंच श्रीमती सुमन भद्दे आणि उपसरपंच श्रीमती बबीता विनोद केदार उपस्थित होते.

24 JUL 2025

## …रेगा अंतर्गत गायरान जमिनीवर …वणार चारा लागवडीचा उपक्रम

…शिव । जिल्हाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली …गतंर्गत गायरान जमिनीवर चारा पिकांची लागवड …ण्याचा उपक्रम राबविण्यात येत आहे. यासाठी जिल्हा… तहसीलदार, गटविकास अधिकारी, …भाग, सामाजिक वनीकरण व पशुसंवर्धन …यांच्या सहभागाने समिती गठीत केली. उपक्रमात …निहाय गायरान जमिनीची माहिती संकलित … चारा लागवड करणार. २५ जुलै रोजी शेती… …मिशनचे अध्यक्ष ॲड. नितेश हेलोंडे … यांनी पाटोदा येथे नेपियर गवत लागवडीच्या …उद्घाटन केले.

Scanned with OKEN Scanner

दिनांक ३१.०७.२०२५ रोजी मा. ना.☐ड आशिषजी जयस्वाल साहेबराज्यमंत्री कृषी, मदत व पुनर्वसन वित्त

यांना कै.वसंतराव नाईक शेती स्वालंबन मिशन चा अहवाल सादर.




